# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02 / 08 / 2023 (बुधवार) सायंकाळ

---

## विनयभंग

पो.स्टे. खापरखेडा :– दिनांक ०१/०८/२०२३ चे २०/०० वा. ते २०/१० वा. दरम्यान फिर्यादी ही आपल्या अंगणात हजर असता यातील **आरोपी नामे– हर्षल जनार्दन गणवीर, रा. नवीन बिना वार्ड क्रमांक एक खापरखेडा** हा फिर्यादी जवळ येऊन तिच्याकडे एकटक पाहून म्हणाला की ''माझी पत्नी घरी नाही आहे तू माझ्या घरी चल'' असे म्हणून हात पकडून फिर्यादीस ओढून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ) भादंवि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पवार ब. नं. ११९ पोस्टे खापरखेडा मो. नं ८०८००८८५२८ हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत मौजा मंगळवारी पेठ उमरेड येथे दिनांक ३१/०७/२०२३ चे ०९.१५ वा. ते ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. माधुरी संजय धांडे, वय ४५ वर्ष, रा. मंगळवारीपेठ याचे पती घरी बसून असतांना आरोपी नामे– १) विशाल देशमुख, वय ४५ वर्ष २) स्वप्नील देशमुख, वय २७ वर्ष ३) किशोर देशमुख, वय ५० वर्ष ४) सौ. वैजंती देशमुख, वय ४५ वर्ष, रा. मंगळवारीपेठ उमरेड विशाल देशमुख यांचा फोन आला व तो म्हणू लागला माझे घराचे काच का फोडली यावरून आरोपींसह इतर आरोपीतांनी फिर्यादीला तिचे पतीला व मुलाला बाहेर आंगणात बोलावून झगडा भांडण करून तुम्ही आमचे घराचे खिडकीचे काच कशाला फोडली या कारणावरून शिवीगाळ करून फिर्यादीचे पतीला व मुलाला हाथबुक्कीने मारपीट केली व त्यांनी सर्वांनी फिर्यादी व फिर्यादीचे परीवाराला जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, ३२३, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे मो. क्र. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत वार्ड क्र. १० गांधी चौक मोहपा येथे दिनांक १८/०७/२०२३ ते दिनांक २८/०७/२०२३ चे २०:०० वा. पर्यंत फिर्यादी नामे– अलिकेत विजय चिमोटे, वय २७ वर्ष, रा. वार्ड १० गांधी चौक मोहपा हा ऑनलाईन वर्क फार्म जॉब शोधत असताना प्रियंका कारे या टेलीग्रॅम या नावाने चॅनल वरून वर्क फार्म होम बद्दल मेसेज आला त्यावर फिर्यादीने रिप्लाय दिला वरून फिर्यादी याला स्टॉक्स बाबत सांगीतल्या वरून फिर्यादी याने १०,०००/–रू डिपॉझीट करून त्यांना ३५,०००/– रू मिळाल्याचे दिसुन आल्याने त्यांनी २५,०००/– रू विड्राल केले त्यामुळे त्यांनी समोरील स्टॉक्स १९ जुलै रोजी रिनीव केला. परंतु दि. १८/०७/२०२३ ते २८/०७/२०२३ पर्यंत टप्याटप्याने ११,७३,०००/– रू. भरून ऑनलाईन फसवणुक केलेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भांदवि. सहकलम ६६ (सि.) माहीती तंत्रज्ञान अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक विजय बारई मो. नं. ९८२२२८९५७२ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत मौजा भवन विदयामंदीर एन. टी. पी. सी. मौदा येथे दिनांक ०१/०८/२०२३ चे १२.३० वा. ते १५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– नितेश आत्माराम चनेकर, वय ३१ वर्ष रा. कन्हान ता. पारशिवनी हे भवन विदयामंदीर ntpc मौदा येथे मागील ०१ वर्षापासुन अॅडमीन व्यवस्थापक या पदावर कार्यरत आहे. त्यांच्या शाळेत मुख्याधापीका नामे– जानकी मनी हे असुन एकुण ५२ शिक्षक आहेत. वर्ग ०१ ते १२ वी पर्यंत मुल व मुली असे एकुण ९४४ विदयार्थी आहेत. दिनांक ०१/०८/२०२३ रोजी १२/३० वा. दरम्यान फिर्यादी आपल्या ऑफीस मध्ये हजर होते तेव्हा शाळेत सर्व शिक्षक आपआपल्या वर्गात शिकवत होते तेव्हा गेटवर चपराशी नामे– सौरभ लांडगे रा. आजनगाव ता. मौदा हे हजर होते तेव्हा आरोपी नामे– मयुर गंगाधर मेहर, रा. इसापुर ता. मौदा याने गेटवर हजर असलेल्या चपराशी यास तो पोलीस आहे असे सांगुन गेट मधुन प्रवेश करून शाळेतील मुख्याध्यापीका जानकी मनी यांना सुध्दा भेटला व त्यांनाही त्याने पोलीस असल्याचे सांगुन त्याने एनटीपीसी कंपनीचा आवारात वारंवार चोरी होतात त्यासाठी शहानिशा करायची आहे. असे सांगुन तसेच वर्ग ५ अ मध्ये जावुन मुलांचे व शिक्षकाचे वेळ वाया घालवुन पोलीस असल्याची खोटी बतावणी करून शिक्षकाची दिशाभुल करून शाळेच्या इमारतीमध्ये अनाधिकृतपणे प्रवेश करून विदयार्थीच्या अभ्यासीकेच्या वेळेची नुकसान करून फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम १७०, ४१९, ४४७ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार पुजारी मो. क्र. ७७७५८११६१९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**